**विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या सुशिक्षित बेरोजगारांना उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत सुधारित योजना**

**उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम.**

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.एसएसआय-२००१/३०६१/(७६९६)/उद्योग-१८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-७ फेब्रुवारी,२००२.

**प्रस्तावना :-**

विशेष घटक योजनेंतर्गत विविध प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमाने अनुसूचित जातीच्या व्यक्तींना सामाजिक न्याय देण्याचे शासनाचे धोरण आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने राज्य शासनाने पुरस्कृत केलेली महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद ही संस्था उद्योजकता प्रशिक्षणाचे काम करीत आहे. समाजकल्याण विभागाशी संबंधित विविध महामंडळांमार्फत मोठया प्रमाणात अनुसूचित जातीच्या व्यक्तींना मदत देण्यात येते. मात्र उद्योजकता विकास अद्यापही अपेक्षेप्रमाणे होत नाही असे निदर्शनास आले आहे.

राज्यातील विशेष घटक योजनेंतर्गत सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारास प्रवृत्त करण्याकरिता त्यांना उद्योजकता विकास व तांत्रिक प्रशिक्षण मिळण्याचे उद्देशाने सुधारित योजना प्रस्तावित केली आहे. सद्या अस्तित्वात असलेल्या उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमात विविध विशेष तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमही घेणे ही गरजेचे आहे. अस्तित्वात असणाऱ्या उद्योजकता विकास योजनामध्ये महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयामार्फत अनिवासी १० दिवसाचे प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येतात. प्रति प्रशिक्षणार्थी १०० रु. विद्यावेतन व प्रशिक्षण देणारे महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांना १००० रु. आकस्मिक खर्चासाठी दिले जातात. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र प्रशिक्षणार्थ्यांकडून रुपये १५० ते २५० पर्यंत जादा शुल्क आकारुन १० दिवसाचे उद्योजकता विकास प्रशिक्षण दिले जाते. त्यात अनुसुचित जातीच्या उद्योजकांस प्रशिक्षणशुल्क व स्वखर्चाने येण्याच्या अडचणीमुळे त्यांचे प्रशिक्षण घेण्याचे आकर्षण कमी प्रमाणात दिसून येते त्यामुळे अनुसूचित जातीच्या व्यक्तींच्या बाबतीत सध्याच्या धोरणात बदल करणे आवश्यक ठरल्यामुळे पुढीलप्रमाणे बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**शासन निर्णय :-**

अनुसूचित जातीच्या सुशिक्षित बेरोजगारांना तांत्रिक प्रशिक्षण देणे आणि त्यांच्यात उद्योजकता विकास करणे बाबत अस्तित्वात असलेल्या योजनेशी सांगड घालून चार ऐवजी तीन कार्यक्रमांच्या व्दारे अंमलबजावणी करीता खालीलप्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहेत.

१. योजनेचे नांव :- उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम.

२. योजनेचा उद्देश :- अनुसूचित जातीच्या सुशिक्षित बेरोजगारांना उद्योजकता विकास आणि तांत्रिक प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगारासाठी त्यांची तयारी करणे.

३. प्रशिक्षण देणारी संस्था :- महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद ( किंवा आवश्यकतेनुरुप उद्योग संचालनालयाने मान्यता दिलेली अन्य सक्षम प्रशिक्षण संस्था )

४. अंमलबजावणी करणारी यंत्रणा :- योजनेची अंमलबजावणी संबंधित महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, मुंबई शहर आणि उपनगरामध्ये उद्योग सह संचालक.योजनेंतर्गत प्राप्त प्रशिक्षणार्थींची निवड आणि पाठपुरावा करण्याकरिता जिल्हास्तरीय समिती मुंबई प्राधिकरण विभाग करतील.

५. कार्यपध्दती :- सदर योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाची निवड करण्यासाठी एक कार्यबल समिती असेल. या समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (मुंबई शहर आणि उपनगरासाठी उद्योग सह संचालक, मुप्रावि, मुंबई ) | अध्यक्ष |
| २. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | उपाध्यक्ष |
| ३. | जिल्हयातील अग्रणी बँकेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (किवा महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या व्यतिरिक्त मान्यता दिलेली प्रशिक्षण संस्था ) | निमंत्रक |

५.१ लाभार्थी विशेष घटक योजनेंतर्गत उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी कर्ज/अनुदान मिळण्याकरिता कोणत्या योजनेंतर्गत पात्र आहे याबाबत कार्यबल समिती मार्गदर्शन करेल.

५.२ प्रशिक्षणार्थींचा प्रकल्प उभारणीकरीता कार्यबल समितीचे घटक संयुक्तपणे प्रयत्न करतील.

५.३ महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राने कार्यबल समितीने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानूसार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत. प्रशिक्षक संस्थेने स्थानिक वर्तमान पत्रांतून जिल्हा रोजगार स्वयंरोजगार व जिल्हा समाज कल्याण कार्यालयात उपलब्ध असलेल्या यादीतून प्रशिक्षणार्थीचे अर्ज मागवावेत. १ दिवसाचे उद्योजकतेबाबत जागृती मेळावे घेऊन अर्ज प्राप्त करता येऊ शकतील. मेळाव्यास, प्रशिक्षण मुलाखतीकरिता व प्रशिक्षणाकरिता येणा-या लाभार्थीस कोणत्याही प्रकारचा प्रवास/दैनिक भत्ता देता येणार नाही.

५.४ उमेदवाराची निवड करताना समितीने महिलांना प्राधान्य दयावे.

५.५ प्रशिक्षण कार्यक्रम झाल्यावर प्रशिक्षण खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता संबंधित प्रशिक्षण संस्थेने जिल्हा उद्योग केंद्राकडे मागणी करावी. योग्य प्रकारे प्रशिक्षण दिल्याची खातरजमा करुन योजनेकरिता ठरविलेल्या खर्चाच्या मार्गदर्शक तत्वानुसार खर्चाची प्रतिपूर्ती महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र किंवा उद्योग सह संचालक, मुंप्रावि, मुंबई करतील.

५.६ प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन, समन्वय व पाठपुरवा महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र वा इतर तत्सम मान्यता प्राप्त प्रशिक्षण संस्था करेल.

५.७ लाभार्थीची पात्रता :-

(१) उमेदवार अनुसूचित जातीचा असावा.
(२) उमेदवार किमान ७ वी पास किंवा पदवी/पदविका/आयटीआय प्रमाणपत्र किंवा किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम प्रमाणपत्र धारक असावा.
(३) उमेदवाराचे वय १८ ते ५० वर्षे असावे.
(४) उमेदवार कोणत्याही वित्त संस्थेचा थकबाकीदार नसावा.

६. योजनेंतर्गत खालीलप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम राहतील. :-

| | प्रशिक्षण कार्यक्रम | कालावधी | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | उद्योजकता परिचय कार्यक्रम | १ दिवस | अनिवासी |
| २. | उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम | १२ दिवस | निवासी |
| ३. | तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम | १५ दिवस ते २ महिने (आवश्यकतेनुसार कार्यबल | अनिवासी |

योजना मुंबई/मुंबई उपनगरासह महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात राबविण्यांत येईल.

## ७. उद्योजकता परिचय कार्यक्रम : ( १ दिवस, अनिवासी )

एक दिवसाच्या परिचय कार्यक्रमात व्यवसायाची निवड, उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, व्यवसाय व्यवस्थापन, शासनाच्या विविध संस्था व अर्थसहाय्य देणा-या संस्था व त्यांचेमार्फत राबविल्या जाणा-या योजनांबाबत माहिती, बाजारपेठ पाहणीबाबत सर्व सामान्य माहिती इ. समावेश राहील. प्रति कार्यक्रम ६००/- रु. खर्च करता येईल.

## ८. उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम : ( १२ दिवस, निवासी )

छोटया उद्योजकांस, उद्योग व व्यवसाय उभारतांना अनेक प्रकारच्या अडचणी भेडसावतात व त्यावर मात करण्याकरीता प्रशिक्षणाव्दारे माहिती अगोदर मिळाल्यास तो उद्योग/व्यवसाय/सेवा उद्योग उभारण्यास सक्षम होईल. प्रशिक्षणाच्या आर्थिक व तांत्रिक बाजूचा विचार करुन प्रशिक्षण १२ दिवसांचे, निवासी/ नास्ता /चहा व भोजन व्यवस्थेसह असेल आणि यासाठी प्रति प्रशिक्षणार्थी रु. ४००० या कमाल मर्यादेपर्यंत रक्कम प्रशिक्षण संस्थेस अनुज्ञेय राहील. ही जबाबदारी संबंधित प्रशिक्षण संस्था घेईल. पात्रतेच्या अटीस अधिन राहून निवडलेल्या प्रशिक्षणार्थींना खालीलप्रमाणे उद्योगाशी संबधित कलागुणांचा विकास व माहिती मिळण्याचा प्रशिक्षणात प्रामुख्याने समावेश राहील.

### ८.१ प्रशिक्षण विषय :-

(१) उद्योजकतेकरिता आवश्यक असलेले गुण व उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
(२) अर्थ सहाय्य देणा-या विविध संस्था व त्यांचे अर्थ सहाय्य मिळण्याकरीता कार्यप्रणाली.
(३) मागणी/बाजारपेठ सर्वेक्षण
(४) विविध उद्योगांमध्ये उपलब्ध असलेल्या संधी
(५) व्यवसायाशी संबधित कायदे व त्याकरिता अवलंबण्याची कार्यपध्दती
(६) व्यवसाय उभारणीत येणा-या अडचणी व त्यांचे निराकरण
(७) हिशाब व इतर लेखाविषयक बाबी.
(८) पणन व्यवस्थापन
(९) उद्योगांना प्रत्यक्ष भेटी व उद्योजकांचे अनुभव
(१०) प्रकल्प अहवाल तयार करणे /तयार करण्यास सहकार्य करणे.
(११) आवश्यकतेनुसार इतर विषय

## ९. तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम :( १५ दिवस ते २ महिने, अनिवासी )

या प्रशिक्षणात उत्पादन/सेवा उद्योगांशी निगडीत असलेल्या प्रकारामध्ये तांत्रिक कौशल्य वाढविणे, नवीन माहिती देणे इत्यादींचा अंर्तभाव राहील. लाभार्थ्यांना स्वतंत्रपणे तो व्यवसाय करण्याकरिता आत्मविश्वास प्राप्त होईल इतपत प्रात्यक्षिके व प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणार्थींना मिळण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणाचे स्वरुप ठेवण्यांत येईल. खालील व्यवसायांचा मुख्यत: तांत्रिक शिक्षण व उद्योजकतेच्या प्रशिक्षणात समावेश राहील.

१) फॅशन डिझायनिंग व विणकाम
२) फोटोग्राफी आणि व्हिडीओ शूटींग
३) बेकरी
४) टाय अँड डाय, बाटिक पेंटींग
५) दुचाकी वाहन दुरुस्ती
६) बंदिस्त शेळी पालन
७) शिवणकाम
८) ब्युटी पार्लर
९) डीटीपी आणि स्क्रीन प्रिंटींग
१०) संगणक जोडणी, दुरुस्ती व देखभाल
११) फळ प्रक्रिया
१२) आयुर्वेदिक वनस्पती लागवड व प्रक्रिया
१३) नर्सरी मॅनेजमेंट
१४) घरगुती उपकरणे दुरुस्ती व देखभाल
१५) मल्टीपर्पज मेकॅनिक्स
१६) केटरिंग व इतर व्यवसाय
१७) इतर उद्योग/सेवा उद्योग (कार्यबल समितीने ठरविलेले)

९.१ प्रशिक्षण अनिवासी असेल व संस्था प्रशिक्षणार्थिस रु. १०००/- दरमहा विद्यावेतन देईल. ( म्हणजेच १५ दिवसाचे कार्यक्रमासाठी त्यांना रु. ५००/- तर २ महिन्याचे कार्यक्रमासाठी रु. २०००/- अदा करण्यात येईल) प्रशिक्षण संस्थेस रु. ३०००/- प्रति प्रशिक्षणार्थीसाठी विद्यावेतनासहीत प्रतिमहा अदा करण्यांत येईल. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र व मुंबई शहर व उपनगराकरीता उद्योग सह संचालक, मुंप्रावि हे योजनेवर नियंत्रण ठेवतील.

१०. उद्योजकता विकास प्रशिक्षण व तांत्रिक कौशल्य विकास प्रशिक्षणात एका वेळेस जास्तीत जास्त ३० प्रशिक्षणार्थी घ्यावे.

११. प्रशिक्षण देणारी संस्था किमान ५ वर्षापासून राज्यात उद्योजकता विकास प्रशिक्षणाच्या क्षेत्रात [illegible] मान्यताप्राप्त असावी. संस्थेमध्ये उद्योजकता प्रशिक्षण क्षेत्रातील केंद्र शासनाने

१२. या योजनेस सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग आणि नियोजन विभागाने सहमती दिलेली आहे.

१३. अनुसूचित जातीच्या सुशिक्षित बेराजगारांना उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी वरील प्रमाणे जी सुधारीत योजना तयार करण्यात आलेली आहे ती वित्त विभाग शा.नि.क्र. विअप्र-१०००/प्र.क्र.४६/२००१/विनियम, दिनांक ११.७.२००१ मधील भाग-पहिला, उपविभाग-३ मधील अनुक्र.४, परिच्छेद क्र.२७(२) अन्वये प्रशासकीय विभागास दिलेल्या अधिकाराचा वापर करुन मंजूर करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( आ. बा. कांबळे )
शासनाचे सह सचिव

प्रति,

विकास आयुक्त (उद्योग), मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त आणि अपर उद्योग संचालक.
सह संचालक (उद्योग) नागपूर/पुणे/नाशिक/औरंगाबाद प्रदेश.
अधिक्षकीय उद्योग अधिकारी, कोंकण/अमरावती विभाग.
सह संचालक, मुंबई महानगर प्राधिकरण, चुनाभट्टी, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी आणि उप आयुक्त (उद्योग)
सचिव, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य विभाग.
संचालक, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, पुणे.
सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद.
महालेखापाल महाराष्ट्र-१, ( लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा ), मुंबई.
महालेखापाल महाराष्ट्र-२, ( लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा ), नागपूर.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-१६/पीयसी, मंत्रालय, मुंबई.